# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळा गुरुवार दिनांक ०६ जून, २०२४ रोजी सकाळी ०८.३० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. सदर सोहळयामध्ये मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मा. प्र—कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण करणे व मोठया पुतळयास फुले वाहणे हा समारंभ आयोजित करणेत आलेला आहे. तसेच सदर कार्यक्रमानंतर प्रभात फेरी, पोवाडा व मर्दानी खेळाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. (सोबत कार्यक्रम पत्रिका जोडली आहे.) तरी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनी या संपूर्ण कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/३७
दिनांक : ०३/०६/२०२४

संचालक
विद्यार्थी विकास विभाग

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांना आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
३. मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांच्याशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्यावेळी ध्वनीमुद्रीत महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत लावण्याची व्यवस्था करावी.
४. वाहन विभागप्रमुख यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या सूचनेप्रमाणे आवश्यक साहित्य ने—आण करण्यासाठी वाहनाची सोय करावी.
५. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी सदर कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
६. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयाची देखभाल पहावी.
७. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाचे परिसरातील बागेची ठाकठिकता पहावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास व लहान पुतळयास असे दोन पुष्पहार आणावेत.
८. आभियांत्रिकी विभाग यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी व लहान पुष्पहार मा. कुलगुरू यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लहान पुतळयास अर्पण केला जाईल. याची नोंद घ्यावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळाचा चौथरा येथे फुलांची सजावट करण्यात यावी.
९. नोटीस बोर्डवर लावणेसाठी—
   १) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३ २) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३
   ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
   ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन ६) तंत्रज्ञान अधिविभाग मुलांचे व मुलींचे वसतिगृह
१०. श्री. डी. आर. चौगुले, जमादार व श्री. के. पी. पुजारी यांनी आस्थापना विभागाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार चार शिपाई या विभागाच्या मदतीस देण्याचे आहेत. त्याची पूर्व सूचना दिनांक. ०५ जून, २०२४ रोजी सर्व संबधितांना त्यांनी द्यावी.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग

### शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळा

### गुरुवार दिनांक ०६ जून, २०२४

## कार्यक्रमपत्रिका

| | | |
|---|---|---|
| सकाळी ०७.०० पासून | : | ध्वनीमुद्रीत पोवाडा (विद्यापीठ प्रांगणात) |
| सकाळी ०८.३० ते ०८.३५ | : | छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लहान पुतळयास पुष्पहार व फुले वाहणे व मोठया पुतळयासमोर फुले वाहून अभिवादन |
| सकाळी ०८.३५ ते ०८.४५ | : | ध्वनीमुद्रीत महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत |
| सकाळी ०८.४५ ते ०९.०५ | : | शिवज्योत रॅली |
| रॅली मार्ग | : | मुख्य प्रशासकीय इमारत — मुख्य उपहारगृहामार्गे परीक्षा भवन — राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृह मार्गे मुख्य इमारत येथे सांगता. |
| सकाळी ०९.०५ ते ०९.३० | : | मर्दानी खेळ सादरीकरण (मुख्य प्रशासकीय इमारती समोर) |
| सकाळी ९.३० ते १०.०० | : | पोवाडा सादरीकरण (राजर्षी शाहू सभागृह येथे) |
| सकाळी १०.१० ते १०.२० | : | राजमाता जिजाऊसाहेब : प्रतिमा पुजन (राजर्षी शाहू संग्रहालय येथे) |

——०००——